**पुष्प – १० : परब्रह्मींचे ठसे**

**उभारिला ध्वज तिहीं लोकांवरी। ऐशी चराचरी कीर्ति ज्याची।।**

१. ज्ञानोबारायादी भावंडांची कौटुंबिक पार्श्वभूमी.

२. आई-वडील, ज्ञानदेवादी भावंडांचे जन्म व बालपण.

३. चरित्रातील मुख्य घटना.

४. ग्रंथवैभव : ज्ञानदेवी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ, अभंगगाथा.

५. सर्वसामान्यांच्या भाषेचे सक्षमीकरण घडवून त्यांद्वारे जीवनकला शिकवली ज्ञानोबारायांनी.

*************************************************

**संतबोल**

- ज्ञानराज माझी योग्यांची माउली। जेणें निगमवल्लि प्रगट केली।। (श्रीनामदेवराय)
- लहानसी मुक्ताई जैसी सणकांडी। केले देशोधडी महान संत।। (श्रीनामदेवराय)
- ज्ञानेश्वर मंगळ मुनी। सेवा करी दासी जनीं ।। (श्रीजनाबाईमाउली)
- निवृत्ति निवृत्ति। म्हणतां पाप नुरे चित्तीं।। (श्रीनाथराय)
- ब्रह्मसाम्राज्यदीपिका। वर्णियेली गीतेची टीका। विठोबाचा प्राणसखा। ज्ञानोबा माझा।। (श्रीनाथराय)
- जग तारावया हरि लीला केली। प्रसिद्ध ती झाली सोपानदेवा।। (श्रीनाथराय)
- मुक्तपणें मुक्त श्रेष्ठपणें श्रेष्ठ। सर्वत्रीं वरिष्ठ आदिशक्ति।। (श्रीनाथराय)
- सुख अनुपम संतांचे चरणीं। प्रत्यक्ष अलंकाभुवनीं नांदतसे।।
  तो हा महाराज ज्ञानेश्वरी माउली। जेणे निगमवल्ली प्रगट केली।। (श्रीचोखोबाराय)

**मंजिरी – १०**

१. ज्ञानदेवांची परंपरा.

२. नाथसंप्रदाय व त्याचा उगम.

३. नाथसंप्रदायाची योगमुद्रा आणि ज्ञानोबारायांकडे परंपरेने आलेली प्रेममुद्रा.

४. नाथ संप्रदायाची शिकवण.

५. गोरक्षनाथांचे कार्य.

६. गहिनीनाथांच्या कार्याचे महत्त्व : गुरूपरंपरेचा अभंग.

******************************************************

**संतबोल**

- आदिनाथ उमा बीज प्रकटिलें। मच्छिंद्रा लाधलें सहजस्थिती।।
  तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली। पूर्ण कृपा केली गयनिनाथा।। (श्रीनिवृत्तिनाथ)
- क्षीरसिंधुपरिसरीं। शक्ती चां कर्णकुहरीं। नेणों कैं श्रीत्रिपुरारीं। सांगितलें जें।। (ज्ञा. १८.१७५१)
- मग तिहीं तें शांभव। अद्वयानंदवैभव। संपादिलें सप्रभव। श्रीगहिनीनाथा।। (ज्ञा. १८.१७५६)
- ना आदिगुरू शंकरा। लागोनि शिष्यपरंपरा। बोधाचा हा सवंसारा। जाला जों आमुतें।। (ज्ञा. १८.१७५८)
- तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळितयां जीवां। सर्व प्रकारीं धांवा। करीं पां वेगीं।। (ज्ञा. १८.१७५९)